ePaper

## उद्धव ठाकरेंनी आत्मपरीक्षण करावे: एकनाथ शिंदे



| वर्ष - 6 | अंक - 303 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- राज्यात भाजपची सत्ता
- युथ डॉयलॉग वुईथ तेजस्वी सूर्या
- ठाकरे गटाला मोठा धक्का!
- "भारताविरोधात षडयंत्र...."

www.mahaenews.com | शनिवार, दि. 18 फेब्रुवारी 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# दादा, सेनेची मतं सांभाळा!

## » अजित पवारांच्या सभेकडे लक्ष : राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांचा 'अंडर करंट'

| पिंपरी | महाईन्यूज | विशेष प्रतिनिधी |

**चिंचवड विधानसभा मतदार संघाची पोटनिवडणूक ऐन रंगात आली असतानाच भारतीय निवडणूक आयोगाच्या निर्णयामुळे महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांच्या मनात धस्स झाले आहे. मूळ शिवसेनेची मते फुटण्याची शक्यता निर्माण झाल्यामुळे 'दादा, सेनेची मत सांभाळा..' अशी मागणी सामान्य कार्यकर्त्यांकडून केली जात आहे.**



राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांची आज पिंपळे निलख येथे प्रचार सभा होणार आहे. महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार विठ्ठल उर्फ नाना काटे यांच्या प्रचारासाठी ही सभा होणार असून, भाजपातील काही नाराज पदाधिकारी राष्ट्रवादीत प्रवेश करणार आहेत. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी या सभेत जोरदार शक्तिप्रदर्शन करणार आहे. दरम्यान, चिंचवडच्या पोटनिवडणुकीला सुरूवात झाल्यापासून उमेदवारी कोणाला? आणि महाविकास आघाडीतील चिन्ह कोणाला? यावरुन शेवटपर्यंत चर्चा- खलबंत सुरू होती. या जागेवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आणि महाविकास आघाडीकडून राहुल कलाटे यांनी दावा केला होता. मात्र, कलाटे यांना राष्ट्रवादीच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांचा विरोध होता. त्यामुळे उमेदवारीची माळ विठ्ठल उर्फ नाना काटे यांच्या गळ्यात पडली. यावर कलाटे यांनी बंडखोरी केली आणि अपक्ष उमेदवारी अर्ज भरला. त्यांना वंचित बहुजन आघाडीने पाठिंबा दिला आहे.

भारतीय निवडणूक आयोगाकडून शिवसेना पक्षाचे नाव आणि चिन्ह याबाबत मोठा निर्णय दिला. 'शिवसेना' पक्षाचे नाव आणि 'धनुष्यबाण' चिन्ह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटाला मिळाले आहे. तर ठाकरे गटाला मोठा धक्का बसला आहे. या मोठ्या निर्णयानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शिवसेना आणि धनुष्यबाण हे नाव घेवून पहिल्यादाच निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत. भाजपा+ शिवसेना महायुतीच्या उमेदवार म्हणून मुख्यमंत्री शिंदे, स्थानिक खासदार श्रीरंग बारणे आता प्रचाराच्या रणांगणात उतरणार आहेत. चिन्ह आणि पक्षाचे नाव मिळाल्यामुळे शिवसेनेला मानणारा मोठा मतदार महाविकास आघाडीकडून भाजपाकडे वळण्याची शक्यता आहे. ही मतांची विभागणी रोखण्याचे आव्हान राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीसह ठाकरे गटाला पेलावे लागणार आहे.

वाल्हेकरवाडी येथे झालेल्या महाविकास आघाडीच्या कार्यकर्ता मेळाव्यात राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी प्रोटोकॉल वगळून आदित्य ठाकरे यांना शेवटी बोलण्याची संधी दिली होती. शिवसेनेची मते एकगठ्ठा मिळाली पाहिजेत. त्यासाठी सर्वांनी एकोप्याने काम करा, असे संदेश दिला होता. आता निवडणूक आयोगाच्या निर्णयानंतर महाविकास आघाडीला आणखी मेहनत घ्यावी लागणार आहे. अन्यथा महाविकास आघाडीचे उमेदवार नाना काटे यांच्या मताधिक्यवर परिणाम होणार आहे. त्यामुळे सामान्य कार्यकर्त्यांची अस्वस्थता वाढली आहे.

### 'राहुल कलाटेंचा फायदा होणार?

» निवडणूक आयोगाच्या निर्णयाचा फायदा अप्रत्यक्षपणे भाजपा उमेदवार अश्विनी जगताप किंवा अपक्ष उमेदवार राहुल कलाटे होण्याची शक्यता आहे. कारण, शिंदे गट आता आक्रमक होणार आहे. महायुतीच्या उमेदवार म्हणून अश्विनी जगताप यांच्या पारड्यात शिवसैनिक मत टाकू शकतात. दुसरीकडे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी राहुल कलाटे यांचा सलोखा आहे. त्यामुळे काहीप्रमाणात शिंदे गटाची मते कलाटेंच्या पारड्यात पडतील, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

# नाना काटे यांना तब्बल ४० संघटनांचा पाठिंबा!

## » मानव कांबळे : भाजपच्या धोरणामुळे देशासमोर भीषण प्रश्न

| पिंपरी | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**भारतीय जनता पक्ष देशात धार्मिक आणि जातीय राजकारण करत आहेत. देशात आर्थिक विषमता वाढत आहेत असून त्यामुळे धार्मिक आणि आर्थिक तणाव निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. जीवनावश्यक वस्तूंची महागाई, स्वातंत्र्यानंतर उच्चांकी पहिल्यांदाच वाढलेली बेरोजगारी हे देशासमोर भीषण प्रश्न असताना भाजप मात्र धर्माच्या आणि मंदिराच्या नावाने राजकारण करत आहे, त्यामुळे परिवर्तन घडणे ही काळाची गरज बनली आहे.**



परिवर्तनाची सुरुवात चिंचवड विधानसभेच्या पोटनिवडणुकीपासून सुरू करण्यासाठी पिंपरी चिंचवड शहरातील सामाजिक व पुरोगामी चळवळीतील तब्बल 40 संघटनांनी चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार विठ्ठल उर्फ नाना काटे यांना आपला पाठिंबा जाहीर केला असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मानव कांबळे यांनी केले आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील विविध पुरोगामी पक्ष, संघटना व सामाजिक कार्यकर्त्यांनी नाना काटे यांना पाठींबा जाहीर केला. त्याप्रसंगी रहाटणी येथे झालेल्या पत्रकार परिषदेत मानव कांबळे बोलत होते. यावेळी झालेल्या पत्रकार परिषदेस महाविकास आघाडीचे उमेदवार विठ्ठल उर्फ नाना काटे, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे, प्रचारप्रमुख भाऊसाहेब भोईर, प्रदेश प्रवक्ते महेश तपासे, मुख्य सरचिटणीस विनायक रणसुभे यांच्यासह नागरी हक्क सुरक्षा समितीचे मानव कांबळे, कष्टकरी संघर्ष महासंघाचे काशिनाथ नखाते, कामगार संघटनेचे डॉ. सुरेश बेरी आदी उपस्थित होते. मानव कांबळे म्हणाले, न्यायव्यवस्था, रिझर्व्ह बँक, निवडणूक आयोग, सीबीआय, इन्कम टॅक्स यांचा उपयोग विरोधी सरकार पाडण्यासाठी केला जात आहे. सर्व प्रकारचे दबाव तंत्र वापरून जर सरकारच्या विरोधात बोलणारे गप्पा बसत नसतील तर कायद्याचा वापर करून पत्रकारांना जेलमध्ये टाकले जात आहे.

### पाठिंब्याबद्दल आभार : नाना काटे

**» सध्या सुरू असलेल्या पोटनिवडणुकीमध्ये परिवर्तन अटळ आहे. मतदारसंघातील मतदार यावेळी विकासकामांच्या मुद्द्यावर मतदान करतील याचा मला विश्वास आहे. भाजपच्या भ्रष्ट कारभाराविरोधात सुरू असलेल्या आमच्या लढ्याला एकाचवेळी चाळीस संघटनांनी पाठिंबा देणे ही माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे. आपण दिलेल्या पाठिंबाद्याबद्दल मी आपला आभारी आहे.**

# राज्यात भाजपची सत्ता!

## » कसब्यात आमदारही आपलाच पाहिजे - चंद्रकांत पाटील

**। पुणे । महाईन्यूज ।**

**कसब्याची निवडणूक ही आपल्यासाठी प्रतिष्ठेची असल्याने ती जिंकायचीच आहे, विधानसभेत कायदे केले जातात, राज्यात भाजप शिवसेनेची सत्ता असल्याने तेथे भाजपचाच आमदार गेला पाहिजे. शेवटच्या दोन दिवसात काँग्रेस तुमच्या कडे 'गांधी' घेऊन प्रचारात येतील. त्याला तुम्ही नाही म्हणत भाजपलाच मतदान करा, असे आवाहन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.**

भाजप महायुतीचे उमेदवार हेमंत रासने यांच्या प्रचारार्थ लोकजनशक्ती पक्षाचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी पाटील बोलत होते. लोकजनशक्ती पक्षाचे शहराध्यक्ष संजय अल्हाट, सरचिटणीस अमर पुणेकर, के. टी. पवार, प्रवक्ते संदीप खर्डेकर आदी उपस्थित होते.

पाटील म्हणाले, कसब्याची निवडणूक ही भाजप विरुद्ध काँग्रेस अशी होत आहे. यामध्ये रासने यांना निवडून द्यायचे असल्याने आजचा मेळावा आहे. मोदी हे गरिबीत जगले आहेत, पण गांधी कुटुंब सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आले, श्रीमंतीमध्ये जगले आहेत. मोदी तुमच्या आमच्या सामान्य आहेत. मोदींमुळे आपण कोरोना काळात आपण जिवंत राहिलो आहोत. त्यांनी मोठ्या प्रमाणात लसीकरण केल आणि अनेक देशांना लस पुरवलीही.पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले, ही निवडणूक रासने विरोध धंगेकर नाही. तर काँग्रेस विरुद्ध भाजप अशी आहे. भाजप विरुद्ध काँग्रेस देशात नाही टिकली तर गल्लीत काय टिकणार, काँग्रेसला साधे विरोधी पक्ष नेतेपदही मिळवता आलेले नाही. राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी आजारी बापट यांना प्रचारात आणल्याबद्दल टीका केली, पण शरद पवार हे आजारी असूनही फिरत आहेत. आम्हाला बापट साहेबांचा अभिमान आहे. गेल्या तीन आठवड्यात गिरीश बापट यांना मी २३ वेळा भेटलो,बोललो आहे. निवडणूक कशी जिंकायची याची चर्चा केली,मार्गदर्शन घेतलं आहे.



### मनसे नेत्यांची भेट

» मनसेने भाजपला पाठिंबा दिल्याने भाजपकडून मनसेचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या भेटी सुरू केल्या आहेत. सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी दीपक पायगुडे, बाळा शेडगे, सुशीला नेटके, अजय शिंदे, प्रल्हाद गवळी यांची भेट घेऊन चर्चा केली. हिंदुत्व आणि विकासाच्या मुद्द्यावर ही भेट घेतली असून, मनसे भाजपच्या पाठीशी भक्कमपणे उभी राहील, असे चव्हाण यांनी सांगितले. दरम्यान दरम्यान, चंद्रकांत पाटील यांनी मनसेचे कसबा विभाग अध्यक्ष गणेश भोकरे यांची त्यांच्या घरी जाऊन भेट घेतली.

### कसब्याची निवडणूक ही भाजप विरुद्ध काँग्रेस

» कसब्याची निवडणूक ही भाजप विरुद्ध काँग्रेस अशी होत आहे. यामध्ये रासने यांना निवडून द्यायचे असल्याने आजचा मेळावा आहे. मोदी हे गरिबीत जगले आहेत, पण गांधी कुटुंब सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आले, श्रीमंतीमध्ये जगले आहेत. मोदी तुमच्या आमच्या सामान्य आहेत. मोदींमुळे आपण कोरोना काळात आपण जिवंत राहिलो आहोत. त्यांनी मोठ्या प्रमाणात लसीकरण केल आणि अनेक देशांना लस पुरवलीही.पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले, ही निवडणूक रासने विरोध धंगेकर नाही. तर काँग्रेस विरुद्ध भाजप अशी आहे.

# यंदा महाशिवरात्रीचा उपवास महाग

## साबुदाणा, शेंगदाण्याच्या दरात वाढ

**। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

महाशिवरात्रीच्या उपवासानिमित्त साबुदाणा, शेंगदाणा, भगरीला मागणी चांगली आहे. मागणी वाढल्याने साबुदाणा आणि शेंगदाण्याच्या दरात वाढ झाली असून भगरीचे दर स्थिर आहेत. त्यामुळे यंदाचा महाशिवरात्रीचा उपवास महाग पडणार आहे.

गेल्या वर्षीच्या तुलनेत घाऊक बाजारात साबुदाण्याच्या दरात क्विंटलमागे ८०० ते एक हजार रुपये,तसेच शेंगदाण्याच्या दरात १५०० ते दोन हजार रुपयांनी वाढ झाली आहे. महाशिवरात्रीला अनेक जण भक्तिभावाने उपवास करतात. उपवासासाठी साबुदाणा, भगर आणि शेंगदाण्याला मागणी वाढली आहे. ग्राहकांकडून असलेली मागणी विचारात घेऊन व्यापारी साबुदाणा, शेंगदाणा, भगर खरेदी करतात. मागणीत वाढ झाल्याने साबुदाणा, शेंगदाण्याच्या दरात वाढ झाली असून भगर स्थिर असल्याची माहिती मार्केट यार्डातील व्यापारी अशोक लोढा यांनी दिली.होत्या.त्यानंतर वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विजयकुमार मगर यांनी बुधवारी (१५ फेब्रुवारी) सायंकाळी या भागातील वाहतूक बदल स्थगित केले. या भागातील वाहतूक पूर्ववत करण्याचे आदेश देण्यात आले. मार्केट यार्डातील भुसार बाजारात तामिळनाडूतून साबुदाण्याची आवक होते. कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि गुजरातमधून शेंगदाण्याची आवक होते. नाशिक भागातून भगरची आवक होते. दरवर्षी जून ते नोव्हेंबर महिन्यापर्यंत शेंगदाण्याला मागणी असते. घरगुती ग्राहक तसेच हॉटेल व्यावसायिकांकडून शेंगदाणा तेलाचा वापर केला जातो.



# अजित पवारांना ४४० चा करंट लागला पाहीजे!

## » चंद्रशेखर बावनकुळे : चिंचवडच्या बैठकीत विरोधकांना दिले आव्हान

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**चिंचवड आणि कसबा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीच्या मतदानासाठी आता काही दिवसच शिल्लक असल्यामुळे सर्वच पक्षांच्या प्रचारात जोर चढू लागला आहे. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी चिंचवड येथे एका बैठकीत बोलत असताना अजित पवार यांच्यावर निशाणा साधला. "२६ तारखेला इतक्या जोरात ईव्हीएमचे बटण दाबा की असा ४४० व्होल्टचा करंट लागला पाहीजे. पुन्हा अजित पवारांनी चिचंवडचे नाव घेतले नाही पाहीजे, याची काळजी तुम्ही घ्या.", असे आवाहन बावनकुळे यांनी केले. त्यामुळे अजित पवार यावर आता काय प्रत्युत्तर देणार याकडे लक्ष लागले आहे.**

चिंचवड विधानसभा मतदारसंघात प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवारी दिवसभर दौरा केला. सकाळपासून सुरु झालेले बैठकांचे सत्र रात्री उशीरापर्यंत सुरु होते. यावेळी रात्री उशीरा झालेल्या एका बैठकीत चंद्रशेखर बावनकुळे यांनी राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांना डिवचण्याचा प्रयत्न केला. रविवारी, २६ फेब्रुवारी रोजी चिंचवड आणि कसबा मतदारसंघात मतदान होणार असल्यामुळे सर्व पक्षांना हा शेवटचा आठवडा प्रचारासाठी मिळणार आहे. त्यामध्ये सर्वच पक्षांनी आरोप-प्रत्यारोपाची फैरी झाडण्यास सुरुवात केली आहे.



### काय म्हणाले चंद्रशेखर बावनकुळे?

» चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, "अश्विनी जगताप यांच्या विरोधात जे निवडणूक लढवत आहेत, त्यांच्या विरोधात अश्विनीताई यांच्यासमोरचे बटण इतक्या जोरात दाबा की, ४४० व्होल्ट करंट लागला पाहीजे. असा करंट लागला पाहीजे की, अजित पवारांनी पुन्हा चिंचवडचे नाव काढले नाही पाहीजे. हा करंट देण्याची ताकद या व्यासपीठावर बसलेल्या लोकांची आहे. ही करंट देण्याची ताकद भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये आहे. हा करंट का दिला पाहीजे? कारण लक्ष्मण जगताप यांच्यासारख्या आमदाराचे निधन झाल्यानंतर त्यांच्या पत्नी निवडणुकीसाठी उभ्या आहेत. अशावेळी त्यांच्याविरोधात निवडणूक लढविणाऱ्यांना हृदय आहे की नाही, माणुसकी आहे की नाही? खरंतर असा लोकांना जागा दाखविण्याची गरज आहे."

# युथ डॉयलॉग वुईथ तेजस्वी सूर्या!

## » रविवारी कार्यक्रम: युवक-आयटीयन्सशी साधणार संवाद

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारतीय जनता पार्टीचे सर्वात कमी वयाचे आणि व्हीजनरी तसेच उच्चशिक्षित खासदार म्हणून ओळख असलेले तेजस्वी सूर्या हे पहिल्यांदाच पिंपरी-चिंचवड शहराचा दौरा करणार आहेत. रविवार, दि. १९ फेब्रुवारी रोजी शहरात येणार आहेत, अशी माहिती भाजपा युवा मोर्चा शहराध्यक्ष संकेत चोंधे यांनी दिली.**



पिंपरी-चिंचवड भाजपा शहराध्यक्ष महेश लांडगे यांच्या पुढाकाराने "युथ डॉयलॉग वुईथ तेजस्वी सूर्या" या कायक्रमाचे आयोजन केले आहे. शहरातील उच्चशिक्षित नागरिक, तसेच आयटीयन्स यांना देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'न्यू इंडिया व्हीजन'बाबत जाणून घेण्याची उत्सुकता नेहमीच असते. भारताची जागतिक पातळीवर 'महासत्ता' अशी ओळख निर्माण होत आहे. त्यामागे 'न्यू इंडिया व्हीजन' चे योगदान काय आहे? याबाबत पिंपरी-चिंचवडकरांना माहिती मिळावी. या करिता हा कार्यक्रम घेण्यात आला आहे.

पिंपळे सौदागर येथील कापसे लॉन्स येथे दि. १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता या कार्यक्रम आयोजित केला आहे.

यासाठी भाजपा युवा मोर्चा, भाजपा आयटी टीम, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आयटी मिलन विभाग, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद यांनी पुढाकार घेतला आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील आयटीयन्स, गृहनिर्माण संस्थांचे पदाधिकारी, प्रतिनिधी, डॉक्टर्स, वकील, सीए अशा उच्चशिक्षित रहिवाशांना निमंत्रित करण्यात आले आहे. या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे 'न्यू इंडिया व्हीजन' विस्तृतपणे सांगण्यात येणार आहे. त्याद्वारे जगाच्या नकाशावर देशाची ओळख 'बलशाली भारत' अशी होत आहे. त्यामध्ये पिंपरी-चिंचवडकर कसे योगदान देवू शकतात? याबाबत तेजस्वी सूर्या मार्गदर्शन करणार आहेत.

### न्यू इंडिया व्हीजनचा होणार ऊहापोह : संकेत चोंधे

**» भारतीय संसद भवनामध्ये आणि राजकीय क्षेत्रात आपल्या घणाघाती आणि अभ्यासपूर्ण वत्कृत्वशैलीमुळे अल्पावधीत युवकांमध्ये प्रचंड लोकप्रिय झालेले देशातील युवा नेतृत्व म्हणून खासदार तेजस्वी सूर्या यांची ओळख आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही सूर्या यांचे अनेकदा कौतूक केले आहे. फाईव्ह ट्रिलिअन इकॉनॉमी, स्टार्ट अप इंडिया, स्कील इंडिया, आर्टिफिशिअल इंटिलिजन्स, २०१४ पूर्वीचा आणि नंतरचा भारत, जी-२० मधील भारताचे प्रतिनिधीत्व, गुड गर्व्हनन्स, डीजिटल इंडिया, भारतीय अर्थसंकल्प, तरुणांच्या अपेक्षा आदी विषयांवर तेजस्वी सूर्या यांचा प्रभावी अभ्यास आहे. 'न्यू इंडिया व्हीजन' च्या माध्यमातून केंद्र सरकार, राज्य सरकारच्या समन्वयाने पिंपरी-चिंचवडमध्ये कशाप्रकारे विविध विकासकामे नियोजित आहेत, याबाबत ऊहापोह या कार्यक्रमाद्वारे होणार आहे, अशी माहिती भाजपा युवा मोर्चाचे शहराध्यक्ष संकेत चोंधे यांनी दिली.**

### "लोकल टू ग्लोबल कनेक्ट वुईथ तेजस्वी सूर्या"...

**» आमदार महेश लांडगे म्हणाले की, पिंपरी-चिंचवड ही 'कॉस्मोपॉलिटीन सिटी' म्हणून ओळखली जाते. भारतातील सर्वाधिक वेगाने विकसित होणाऱ्या शहरांच्या यादीत पिंपरी-चिंचवडचा पहिल्या १० मध्ये क्रमांक लागतो. 'स्मार्ट सिटी'मुळे राहण्यासाठी सर्वोत्तम शहर (इज ऑफ लिव्हींग) म्हणून आपली उद्योगनगरी विकसित होत आहे. शहारातील उच्चशिक्षित नागरिक जसे स्थानिक पायाभूत सुविधांबाबत जागरुक आहेत. तसेच जागतिक पातळीवर भारताची प्रतिमा उंचावण्यासाठी आग्रही आहे. खासदार तेजस्वी सूर्या यांच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे 'न्यू इंडिया व्हीजन' ऐकण्याची पर्वणी या निमित्ताने पिंपरी-चिंचवडकरांना उपलब्ध झाली आहे. "लोकल टू ग्लोबल कनेक्ट वुईथ तेजस्वी सूर्या" असा हा कार्यक्रम निश्चितच मार्गदर्शक ठरणार आहे.**

---

# वाकड-पुनावळेत भाजपाचा प्रचाराचा झंझावत!

## » गृहनिर्माण सोसायट्यांची साथ : अश्विनी जगताप यांची प्रचारात आघाडी

।पिंपरी चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीतील भाजप आणि मित्र पक्षांच्या अधिकृत उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी शुक्रवारी (ता. १७) वाकड आणि पुनावळे भागात पदयात्रा काढून मतदारांशी वैयक्तिक संपर्क साधला. गृहनिर्माण सोसायट्यांतील मतदारांशी संवाद साधून त्यांना येणाऱ्या अडीअडचणी समजून घेतल्या. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी सोसायट्यांना सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नेहमीच पुढाकार घेतला. त्यामुळे त्यांच्या पत्नी अश्विनी लक्ष्मण जगताप यांना विजयी करण्याचा निर्धार वाकड आणि पुनावळेतील गृहनिर्माण सोसायटीधारकांनी केला.**



अश्विनी लक्ष्मण जगताप यांच्यासह भाजप व मित्रपक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सकाळी वाकडमध्ये म्हातोबा मंदिरात दर्शन घेऊन पदयात्रेला सुरूवात केली. प्रत्येक गृहनिर्माण सोसायट्यांच्या दारात जाऊन मतदारांशी संवाद साधला. त्यांच्या या संवाद पदयात्रेला मतदारांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आमदार लक्ष्मण जगताप यांनीही चिंचवड मतदारसंघात विकास, विकास आणि फक्त विकासच केला आहे. त्यामुळे आपण मतदारांनी कमळाला साथ द्यावी. मला भरघोस मतांनी विजयी करावे, असे अवाहन अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी मतदारांना केले. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी गृहनिर्माण सोसायट्यांच्या पाणीटंचाईवर मात करण्यासाठी मोफत टँकर उपलब्ध करून दिल्याचेही अश्विनी जगताप यांनी सांगितले.

यावेळी माजी महापौर राहुल जाधव, स्थायी समितीच्या माजी अध्यक्षा ममता गायकवाड, संतोष लोंढे, माजी नगरसेवक संदिप कस्पटे, विनायक गायकवाड, विशाल कलाटे, राम वाकडकर, कुणाल वाव्हळकर, स्नेहा कलाटे यांच्यासह भाजप, बाळासाहेबांची शिवसेना, आरपीआय (आठवले गट), रासप, शिवसंग्राम संघटना, रयत क्रांती संघटना, प्रहार संघटना या महायुतीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सोसायटीधारकांच्या समस्या सोडवण्यास भाजपा कटीबद्ध...

**»वाकडमधील काळाखडक परिसर हा प्रामुख्याने झोपडपट्टीचा म्हणून गणला जातो. कोरोना काळात दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी केलेल्या मदतीची आठवण झोपड्पट्टीवासीयांनी अश्विनी जगताप यांना सांगत लक्ष्मणभाऊंनी केलेल्या मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. त्यांनी वाकड आणि पुनावळेतील गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये जाऊन मतदारांना भाजपसोबत येण्याचे आवाहन केले. सोसायट्यांना येणाऱ्या अडीअडचणी सोडवण्यासाठी भाजप कटिबद्ध असल्याचे त्यांनी मतदारांना सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसित भारताचे स्वप्न पाहिले आहे. त्यांच्या या स्वप्नाला आपण सर्वांनी मजबूत करणे गरजेचे आहे. तसे झाले तरच आपला विकास होणार आहे.**

## संपादकीय »

# समृद्धीकडे नेणारे सहकार धोरण

***भारतातील सहकार क्षेत्र 'सहकार से समृद्धी' हे लक्ष्य घेऊन आंतरराष्ट्रीय पातळीवर झेप घेण्यासाठी सज्ज होत आहे. ही झेप घेण्यासाठी केंद्र व राज्य सरकारे विविध योजना आखत आहेत. या वाटचालीची रूपरेखा स्पष्ट करणारा लेख.***

'विना सहकार नहीं उद्धार', असा नारा देत उभी राहिलेली सहकार चळवळ अनेक चढउतारांमधून प्रवास करत इथवर पोचली आहे. 'इंटरनॅशनल कोऑपरेटिव्ह अलायन्स' (एशिया-पॅसिफिक)च्या आकडेवारीनुसार भारतात आठ लाख ५४ हजार ३५५ सहकारी संस्था आहेत. २९.०६ कोटी इतकी सदस्यसंख्या आहे. भारतात पतपुरवठा करणाऱ्या आणि न करणाऱ्या अशा ढोबळ वर्गीकरणात सहकारी संस्था आहेत. पतपुरवठा करणाऱ्या संस्थांमध्ये प्राथमिक कृषी पतसंस्था ते बहुराज्य सहकारी बँका असा विस्तार आहे. पतपुरवठा न करणाऱ्या सहकारी संस्थांमध्ये सहकारी गृहरचना संस्था, डेअरी, ग्राहक भांडार, अनुसूचित जाती/जमाती, महिला विकास संस्था इत्यादींचा समावेश आहे.

भारतात १७ सहकारी महासंघ (फेडरेशन), ३९० राज्यस्तरीय सहकारी महासंघ, २७०५ जिल्हास्तरीय सहकारी महासंघ आणि १४३५ बहुराज्य सहकारी संस्था आहेत. भारतातील सहकार क्षेत्र 'सहकार से समृद्धी' हे लक्ष्य घेऊन आंतरराष्ट्रीय पातळीवर झेप घेण्यासाठी सज्ज होत आहे. ही झेप घेण्यासाठी केंद्र व राज्य सरकारे विविध योजना आखत आहेत. त्या योजनांची व्याप्ती आणि भविष्यातील आवाका लक्षात येण्याच्या दृष्टीने वरील आकडेवारीचा आढावा घेतला आहे. जुलै २०२१ मध्ये केंद्रीय सहकार मंत्रालयाची स्थापना झाली. सहकार क्षेत्राला प्रशासकीय, कायदेशीर मार्गदर्शन तसेच विकासाठी साहाय्य करण्यासाठी या मंत्रालयाची स्थापना करण्यात आली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सहकार मंत्रालयाचीदेखील धुरा सांभाळली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली सहकार क्षेत्रासाठी २० प्रमुख क्षेत्र, मुद्द्यांवर भर देऊन सहकार क्षेत्राला नवसंजीवनी देत आंतरराष्ट्रीय पातळीवर नेण्याची योजना आखण्यात आली आहे.या योजनेत बदलते तंत्रज्ञान, बदलती आर्थिक-सामाजिक व्यवस्था यांचा विचार करुन तरतुदी करण्यात आल्या आहेत. काही योजना केंद्रीय सहकार मंत्रालयाच्या पातळीवर राबवल्या जात आहेत, तर काही योजनांना केंद्रीय अर्थसंकल्पातील तरतुदींच्या माध्यमातून कार्यान्वित करण्यात आले आहे. याच महत्त्वपूर्ण योजनांचा आढावा घेण्याचा प्रयत्न इथे करण्यात आला आहे.वर्ष २०२३-२४ साठीच्या केंद्रीय अर्थसंकल्पात सहकार क्षेत्रासाठी उपयुक्त अशा अनेक तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

# पंचायतींकडे जमिनींचे ऑडिट हवेच!






भारताच्या एकूण क्षेत्रफळापैकी एकचतुर्थांश हिस्सा सार्वजनिक संसाधनांचा आहे. त्यात सामुदायिक जंगले आहेत, गायराने, कुरणे आहेत. ग्रामीण भारतातील ३५ कोटी गरिबांची उपजीविका या संसाधनांवर अवलंबून आहे. भारतीय राज्यघटनेने यांची मालकी आणि संरक्षणाचे हक्क ग्रामपंचायतींना दिले आहेत. मात्र, त्याची त्यांना ना माहिती आहे ना त्यासाठीचे कौशल्य. या सार्वजनिक मत्तांचे संरक्षण करण्यासाठी सामुदायिक जमिनींचे ऑडिट हाच अत्यावश्यक उपाय ठरू शकतो.

महाराष्ट्रात 'गायरान', राजस्थानात 'शामलात', ओडिशात 'सर्बसाधारण', तमिळनाडूत 'पोरम्पोक्कू' या नावांनी गावाच्या मालकीच्या सामुदायिक जमिनी अस्तित्वात आहेत. त्यांच्यावरील संसाधनांचा संपूर्ण गावे एकत्रित वापर करतात. देशातील एकूण जमिनीपैकी एकचतुर्थांश जमिनी सामुदायिक मालकीच्या आहेत. ग्रामीण भारतातील ३५ कोटी गरिबांची उपजीविका या सामायिक संसाधनांवर अवलंबून आहे. त्यांचा चारा, इंधन, वनोपज, मासे, बांबू असे कित्येक घटक याच सामुदायिक मालमत्तेतून येतात. तरीही त्यांची प्रचंड वाताहत झाली आहे. खासगी मालमत्तांसारख्या यांच्या सीमा निश्चित झालेल्या नाहीत. अनेक ठिकाणी मालकी हक्कांचे तंटे सुरू आहेत. त्यावर पिढ्यान् पिढ्या गुजराण करणाऱ्या समुदायांच्या हक्कांचे, वहिवाटीचे कागदोपत्री दस्त केलेले नाहीत. या ठिकाणी वैयक्तिक मालकीसाठी खासगी अतिक्रमण झाले आहे किंवा त्यावर अवलंबून असलेले समुदाय अन्य वा अधिक उत्पादक साधनांकडे वळल्याने त्यांचे रूप बदलले आहे.

### सामायिक मत्तांचे संरक्षण

स्वातंत्र्यानंतर देशातील जमिनींच्या फेरवाटपात नागरिकांना खासगी जमिनींचे हक्क मिळाले आणि सामुदायिक जमिनी राज्य सरकारच्या अखत्यारीत आणल्या गेल्या, पण त्यातील बराचसा भाग 'वरकड' वा 'ओसाड' जमीन म्हणून नोंदला गेला आहे. भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ३९ (ब) नुसार "सामूहिक हिताला सर्वाधिक उपकारक होईल अशा रीतीने समाजाच्या भौतिक साधनसंपत्तीचे स्वामित्व व नियंत्रण यांची विभागणी व्हावी". मात्र, त्याचे पालन किंवा न्याय्य वापर हा देशाच्या कल्याणकारी चौकटीतून आखण्यात आलेल्या धोरणांवर अवलंबून आहे. त्यासाठी मुळात, राज्याची भूमिका या मत्तेचे रक्षण करणाऱ्या विश्वस्ताची आहे, मालकाची नाही. जगताप सिंग आणि इतर विरुद्ध पंजाब राज्य आणि इतर (२०११) यांसारख्या महत्त्वाच्या न्यायालयीन निकालांनी, सामुदायिक मालमत्तेवरील सामुदायिक हक्क अधोरेखित केले आहेत.

साधारणपणे या जमिनींचे व्यवस्थापन राज्यांच्या महसूल आणि वन विभागांकडे आहे. अर्थात, ७३ व्या घटनादुरुस्तीनंतर ग्रामपंचायतींकडे गावाच्या सामायिक जमिनींचे व्यवस्थापन व संरक्षणाचे हक्क आले. या जमिनींचे संवर्धन, तेथील जल व्यवस्थापन, सामाजिक कल्याण व सामुदायिक मालमत्तांचे व्यवस्थापन पंचायत राज संस्थांकडे आले. मात्र, त्यासाठी पंचायत संस्थांना आवश्यक कौशल्य, साधने आणि सहयोग मात्र मिळाला नाही.

### 'मत्ता नोंदवही' म्हणजे काय?

ही पंचायत संस्थांच्या ताब्यातील सामुदायिक मालमत्तांची यादी आहे. पंचायत संस्थांना त्यांच्या ताब्यातील मालमत्तांची माहिती व्हावी, त्याची सद्यःस्थिती, मूल्यांकन माहीत असावे हा याचा उद्देश. या रजिस्टरमुळे ग्रामपंचायतींना त्यांच्या मालमत्तांचा शोध घेणे, त्यांचे नुकसान वा चोऱ्या रोखणे, त्यांचे संवर्धन करणे हे अंकेक्षणाच्या – म्हणजेच ऑडिटच्या माध्यमातून शक्य आहे. ही मत्ता नोंदवही कारभारात पारदर्शकता आणणे, भ्रष्टाचाराचा धोका कमी करणे आणि राजकीय उत्तरदायित्वाचा पाया रचणे यांसाठी अत्यंत प्रभावी साधन ठरू शकते. अर्थात, ती तयार करतानाच किमान पातळीवरील देखभालीचा विचार करावा लागतो. जमिनीचा दुरुपयोग रोखण्यासाठी प्रत्यक्ष स्थळांचे सामाजिक अंकेक्षण किंवा सोशल ऑडिट गरजेचे असते.

### दुहेरी शोकांतिका

मत्ता नोंदवहीची जबाबदारी ग्रामपंचायतीची असते. मात्र, त्यासाठी ग्रामपंचायती सक्षम आहेत असे गृहीत धरले गेले. प्रत्यक्षात त्यांना याबाबतची ना माहिती आहे ना हे कसे करावे याचे ज्ञान. ही नोंदवही कशी असावी याची रचना राज्यांनी तयार केली असली तरी ती भरण्याची प्रक्रिया, त्याचा पाठपुरावा व नियंत्रण व्यवस्थित केले जात नाही. बहुतांश ठिकाणी पंचायती त्यांच्या मालकीच्या इमारती, कार्यालये या मालमत्तांची एक यादी तयार करून ठेवतात.

# महाशिवरात्रीला जागरण का करावे?

**सद्गुरू - भारतीय परंपरेत, वर्षभरात ३६५ उत्सव असतात. आज, आर्थिक कारणांमुळे आणि आपण आपल्या कामाची रचना ज्या पद्धतीने केली आहे त्यामुळे, त्यापैकी बरेच सण लोप पावले आहेत.**



आजही सुमारे ५० ते ६० सण वेगवेगळे लोक साजरे करत आहेत, परंतु ती संख्याही कमी होत आहे. सुमारे ५/६ उत्सव मोठ्या थाटात साजरे केले जात आहेत. जवळपास प्रत्येक भारतीय सण चंद्रसौर कॅलेंडरशी जोडलेला असतो. त्यादिवशी सूर्यमालेत काय घडत असेल याचा विचार करून आपल्यासाठी जे अनुकूल आहे, असे काहीतरी आपल्याला करायचे आहे.

हे शरीर निर्माण करण्यासाठी सौर यंत्रणा कुंभाराच्या चाकासारखी काम करत आहे. सूर्यमालेत जे काही घडते ते सर्व काही आपल्या बाबतीत घडते. या परंपरेत, सूर्यमालेत ठराविक दिवशी काय घडत आहे याचे अतिशय बारकाईने निरीक्षण केले गेले आहे आणि त्यानुसार, आपण ठराविक प्रकारचा उत्सव तयार केला जिथे आपण ठराविक गोष्टी करतो. महाशिवरात्रीला आपला ग्रह एका ठराविक प्रकारे फिरत असतो. तो फक्त त्याच्या अक्षावर फिरत नाही - तो नेहमी किंचित डुगडुगत असतो. त्या डुगडुगण्यामुळे ग्रहावर एक ठराविक प्रकारची परिस्थिती निर्माण होते. म्हणून, महाशिवरात्रीच्या रात्री उत्तर गोलार्धात ऊर्जेचा प्रवाह नैसर्गिकपणे वरच्या दिशेला होत असतो.

महाशिवरात्रीला जेव्हा शक्ती वरच्या दिशेने जाण्याचा प्रयत्न करत असतील आणि तेव्हा जर तुम्ही आडवे झालात, तर तुम्ही त्यामध्ये अडथळा आणत आहात. तुम्ही केवळ फायदा गमावत नाही, तुम्ही एका स्तरावर स्वतःचे नुकसानसुद्धा करू शकता. या सर्व गोष्टी तुमच्यासाठी तेव्हाच महत्त्वाच्या असतात जेव्हा तुम्हाला एक संपूर्ण विकसित मनुष्य बनायचे असते. एक संपूर्ण विकसित मनुष्य असण्याचा अर्थ असा आहे की तुमच्यामध्ये उघडता येणारी प्रत्येक क्षमता तुम्हाला उघडी करायची आहे. या उद्देशासाठी, आपण 'जागरण' नावाची गोष्ट तयार केली म्हणजे सतर्क राहून पाठीचा कणा ताठ ठेवणे.हक्कांची फेररचना केली जावी. विषमता व शोषणमुक्त भारतासाठी ही अत्यावश्यक बाब आहे. असे केले तर अन्न व वस्त्र या मूलभूत गरजांची पूर्तता स्थानिक पातळीवर होईल व सर्वांना रोजगार मिळेल.

दुसरे म्हणजे, आज भारतासह जगाला निसर्गस्नेही विकास मार्गाची आवश्यकता आहे. यासाठी जीवाश्म अथवा खनिज इंधन (कोळसा, तेल, वायू) आधारित ऊर्जा, वाहतूक, उत्पादन व उपभोग पद्धतीला सोडचिठ्ठी दिली पाहिजे. सुदैवाने, आज याला जैव, सौर, पवन ऊर्जा पर्याय आहेत. विशेष म्हणजे ते स्वस्त, सुरक्षित, विकेंद्रितपणे व शीघ्रगतीने अमलात आणणे शक्य आहे.

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# ठाकरे गटाला मोठा धक्का!

## शिंदे गटाला धनुष्यबाण चिन्ह, शिवसेना हे नाव! निवडणूक आयोगाचा मोठा निर्णय

।मुंबई। महाईन्यूज ।

**देशातील राजकारणातून सर्वात मोठी बातमी समोर आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटाला शिवसेनेचं नाव आणि धनुष्यबाण चिन्ह मिळालं आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने हा निर्णय दिला आहे. हा निर्णय म्हणजे उद्धव ठाकरे यांच्यासाठी हा खूप मोठा धक्का असल्याचे म्हटले जात आहे.**



दरम्यान, या निकालानंतर उद्धव ठाकरे गटाची आगामी रणनीती काय असेल हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.आठ महिन्यांपूर्वी महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा भूकंप झाला होता. एकनाथ शिंदेंनी ४० आमदारांसह बंडखोरी केली होती. त्यानंतर एकनाथ शिंदेंनी शिवसेना पक्ष आणि चिन्हावर दावा केला होता.

यानंतर मागील आठ महिन्यांपासून निवडणूक आयोगात सुनावणी सुरु होती. ही सुनावणी आता पूर्ण झाली असून बहुमताच्या आधारावर निवडणूक आयोगाने हा निर्णय दिला आहे. या निर्णयाचे शिंदे गटाकडून स्वागत केले जात आहे. तर या निर्णयाविरोधात कायदेशीर लढाई लढण्याचे संकेत संजय राऊत यांनी दिले आहेत.

> हा निर्णय बहुमताच्या आधावर घेतला आहे. लोकशाहीत बहुमताला महत्त्व आहे. हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे. त्यांना आरोप करण्याचे स्वातंत्र्य आहे. त्यांनी आरोप करायचा असेल तर करावा."
>
> - एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री

> भाजपला मुंबई महापालिका कोणत्याही परिस्थितीत जिंकायची आहे. धनुष्यबाण त्यांच्या हातात देऊन मुंबई जिंकण्याचा प्रयत्न ते करतील. कदाचित मशाल चिन्हही जाऊ शकतं. पण त्यांनी कागदावरचा धनुष्यबाण त्यांनी मिळवला असला तरी खरा धनुष्यबाण आपल्याकडेच आहे. शिवसेना प्रमुखांच्या देव्हाऱ्यातला धनुष्यबाण आपल्याकडे असून हा धनुष्यबाणच त्यांना जागा दाखविल्याशिवाय राहणार नाही, असा दावा उद्धव ठाकरे यांनी केला.
>
> - उद्धव ठाकरे

दोन्ही गटांची बाजू ऐकून निवडणूक आयोगाचा निर्णय

खरी शिवसेना कोणाची तसेच धनुष्यबाण हे निवडणूक चिन्ह कोणाचे याबाबत निवडणूक आयोगाने दोन्ही म्हणजेच ठाकरे तसेच शिंदे गटाला आपापली बाजू मांडण्याचे निर्देश दिले होते. त्यासाठी दोन्ही गटांना पदाधीकारी तसेच पक्षातील अन्य महत्त्वाच्या नेत्यांचा पाठिंबा असल्याचे सिद्ध करा, असेही निवडणूक आयोगाने सांगितले दिले होते. त्यानंतर दोन्ही गटाने पदाधिकाऱ्यांचा पाठिंबा असलेली कागदपत्रं निवडणूक आयोगासमोर सादर केली होती.

दरम्यान, या निकालानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. “लोकशाहीत बहुमताला महत्त्व असते. आज आपण पाहिले राज्यात बहुमताचे सरकार स्थापन झाले आहे.

हा बहुमताचा विजय आहे. हा लोकशाहीचा विजय आहे. मी पुन्हा एकदा सांगतो बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे यांच्या विचारांचा हा विजय आहे,” असे एकनाथ शिंदे म्हणाले आहेत.

# लव्ह जिहाद विरोधी कायद्याबरोबर इस्लामपूरचे ईश्वरपूर नामकरणासाठी मोर्चा

## इस्लामपूरमध्ये हिंदू गर्जना मोर्चाचे आयोजन

।सांगली। महाईन्यूज ।

**लव्ह जिहाद व धर्मांतर बंदी कायद्याच्या मागणीसाठी लव्ह जिहाद व धर्मांतर बंदी कायदा करावा या मागणीसाठी शुक्रवारी इस्लामपूरमध्ये हिंदू गर्जना मोर्चा काढण्यात आला. यावेळी इस्लामूपरचे नामकरण ईश्वरपूर करावे आणि संभाजी महाराज यांचा बलिदान दिन धर्मवीर दिन म्हणून साजरा करण्यात यावा, अशी मागणी सकल हिंदू समाजाच्यावतीने करण्यात आली.**



इस्लामपूरमध्ये सकल हिंदू समाजाच्यावतीने काढण्यात आलेल्या हिंदू गर्जना मोर्चाची सुरूवात शिवाजी चौकामध्ये करण्यात आली. गांधी चौक, ब्राम्हणपुरी, गणेश मंडई, यमा चौक मार्गे हा मोर्चा काढण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ मोर्चाची सांगता करण्यात आली. लव्ह जिहाद विरोधी कायदा करण्यात यावा, धर्मातर रोखण्यासाठी कायदा करावा, गोवंश हत्त्या बंदी कायद्याची कठोरपणे अवलंब करण्यात यावी, उरण इस्लामपूरचे नामकरण उरण ईश्वरपूर करण्यात यावे आणि छत्रपती संभाजी महाराज यांचा बलिदान दिन धर्मवीर दिन म्हणून साजरा करण्यात यावा आदी पाच मागण्या या मोर्चाच्यावतीने करण्यात आल्या.

या मोर्चामध्ये माजी नगराध्यक्ष निशीकांत पाटील, विक्रम पावसकर, राहूल महाडिक, संजय भागवत, आनंदराव पवार, वैभव पवार, धैर्यशील मोरे, मधुकर हुबाले, सुनिता निशीकांत पाटील, वंदना थोरात, शोभा जगताप, सुरेखा जगताप, जयश्री रणदिवे, स्मिता पवार, निता कदम आदींसह हजारो कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# शिर्डीत सहलीला गेलेल्या 88 विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा

## उलटीचा होऊ लागला त्रास

। अहमदनगर । महाईन्यूज ।

पंढरपुरातील घटना ताजी असतानाच, आता शिर्डीतून ) एक धक्कादायक बातमी समोर आलीये. अमरावतीहून (AMRAVATI) शिर्डीत आलेल्या विद्यार्थ्यांना जेवणातून विषबाधा झाल्याची माहिती आहे.

काल रात्री जेवणानंतर अचानक उलटी आणि मळमळीचा त्रास सुरू झाल्यानं विद्यार्थ्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं. यात जवळपास 88 जणांना अन्नातून विषबाधा झाल्याचं समोर आलंय.

विद्यार्थ्यांवर शिर्डीतील साईनाथ रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अमरावतीतील दर्यापूर तालुक्याच्या आदर्श हायस्कूलची शिर्डीला सहल आली होती. इयत्ता चौथी ते सहावीचे एकूण 230 विद्यार्थी सहलीला आले होते.

या विद्यार्थ्यांची शाळेनं नेवासा इथं थांबण्याची व्यवस्था केली होती. सहलीच्या ठिकाणी जेवण केल्यानंतर मुलांची प्रकृती बिघडली. काल रात्री जेवण केल्यानंतर 88 विद्यार्थ्यांना उलटी आणि मळमळचा त्रास होऊ लागला होता. दरम्यान, सर्व विद्यार्थ्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती डॉ. प्रितम वडगावे यांनी दिली.



# भारताविरोधात षडयंत्र!

## मोदींना अदाणी प्रकरणात उत्तर मागणाऱ्या जॉर्ज सोरोस यांच्यावर स्मृती इराणींची टीका

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।

**हिंडेनबर्गचा अहवाल आल्यानंतर प्रसिद्ध उद्योजक गौतम अदाणी यांना मोठा झटका तर बसलाच शिवाय विरोधकांना मोदी सरकारविरोधात बोलण्यास एक मुद्दाही मिळाला. राहुल गांधी यांनी मागच्याच आठवड्यात लोकसभेत केलेल्या भाषणात सरकारला अदाणी प्रकरणावरून प्रश्नांची सरबत्ती केली. तसंच संयुक्त संसदीय समिती स्थापन करून या प्रकरणी चौकशी करावी अशीही मागणी विरोधकांनी केली.**

मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या उत्तराच्या भाषणात अदाणी हे नावही उच्चारलं नाही. त्यानंतर आज अमेरिकेतले अब्जाधीश गुंतवणूकदार जॉर्ज सोरोस यांनी मोदींवर टीका केली आहे. तसंच मोदींना अदाणी प्रकरणावर बोलावंच लागेल असंही त्यांनी म्हटलं आहे. त्याच सोरोस यांना स्मृती इराणी यांनी उत्तर दिलं आहे. आजच्या घडीला भारताचे आभार मानणाऱ्यांमध्ये अमेरिकेचे राष्ट्रपती आहेत. फ्रान्सचे राष्ट्रपती आणि इंग्लंडचे पंतप्रधान सुद्धा आहेत. भारताने या देशांशी चांगले आर्थिक संबंध जोपासल्याबद्दल हे देश आभार मानतात. जग मंदीच्या काळातून जात असताना आपला देश जगात पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था ठरला आहे. अशावेळी जॉर्ज सोरोस सारखे लोक भारताच्या लोकशाही व्यवस्थेत हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न करत आहेत. जॉर्ज सोरोस यांनी केलेली ही मागणी म्हणजे त्यांना वाटत असेल की आपण मोदींना भारतात झुकवू शकतो. मात्र लोकशाही पद्धतीने निवडलेल्या आपल्या सरकारने अशा उद्योजकांना ठोस उत्तर दिलंच पाहिजे.भारताची लोकशाही व्यवस्था आणि तिचा पाया प्रचंड मजबूत आहे. अशावेळी या लोकशाही व्यवस्थेला सुरूंग लावण्यासाठी कट आणि षडयंत्र रचली जात आहेत. जो व्यक्ती आर्थिक युद्धाचा अपराधी आहे तो व्यक्ती आज मोदींकडे उत्तर मागतो आहे. अनेक देशांच्या विरोधात दावा करणारे जॉर्ज सोरोस हे आता भारतीय लोकशाही व्यवस्था खिळखिळी करण्यासाठी आरोपांचे मनोरे रचत आहेत असं म्हणत स्मृती इराणी यांनी सोरोस यांना उत्तर दिलं आहे. एवढंच नाही तर अशा माणसाला आपल्या देशाने आपल्या एकजुटीतून उत्तर दिलं पाहिजे असंही स्मृती इराणींनी म्हटलं आहे.

स्मृती इराणी पुढे म्हणाल्या की मी या देशाची एक नागरिक आहे. त्याच अनुषंगाने मी तुम्हाला सगळ्यांना आवाहन करते आहे की अशा विदेशी ताकदीच्या विरोधात आपण सगळ्यांनी उभं राहुया. जॉर्ज सोरोस सारखे लोक जेव्हा आपल्या लोकशाही पद्धतीने निवडून दिलेल्या सरकारला आव्हान देतील तेव्हा आपण सगळ्यांनी त्यांचा कडाडून विरोध करूया असंही स्मृती इराणी यांनी स्पष्ट केलं. लोकशाहीवादी, पारदर्शकतेला प्राधान्य आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी काम करणाऱ्या गटांना ते निधी पुरवत असतात.



### कोण आहेत जॉर्ज सोरोस?

**जर्मनी येथे होत असलेल्या म्युनिक सुरक्षा संमेलनाच्या आधी जॉर्ज सोरोस यांनी म्युनिक विद्यापीठात एका कार्यक्रमात बोलत असताना सदर वक्तव्य केलेलं आहे. तसेच गौतम अदाणी यांच्या अदाणी समूहाने शेअर मार्केटला वेठीस धरल्यामुळे भारताच्या विश्वासार्हतेला कसा तडा गेला? यावरही भाष्य केले. जॉर्ज सोरोस हे ओपन सोसायटी फाउंडेशन या संस्थेचे संस्थापक आहेत. त्यांची संपत्ती ८.५ अब्ज डॉलर्स एवढी आहे**

---

# दिल्ली महापौर निवडणूक: आपच्या दोन नगरसेवकांना मतदान करण्यास सुप्रीम कोर्टाची मनाई!

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।

दिल्ली महापालिकेच्या महापौर निवडणूक प्रक्रियेत आम आदमी पार्टीला सर्वोच्च न्यायालयाकडून मोठा दिलासा मिळाला आहे. नायब राज्यपालांनी नामनिर्देशित केलेले नगरसेवक महापौरपदाच्या निवडणुकीत मतदान करणार नसल्याचा महत्त्वपूर्ण निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. दिल्ली महापालिकेच्या महापौर निवडणूक तीन वेळा जाहीर झाली, पण गदारोळामुळे ही निवडणूक होऊ शकली नाही.

गेल्या 6 फेब्रुवारी 2023 रोजी महापौर आणि उपमहापौरपदासाठी तिसऱ्यांदा निवडणूक प्रक्रिया घेण्यात आली. पण नायब राज्यपालांनी नामनिर्देशित केलेले सदस्यांनाही महापौर आणि उपमहापौरपदाच्या निवडणुकीत मतदान करण्यास यावेळी परवानगी देण्यात आली होती. हे



सदस्य भाजपाच्या पारड्यात मते टाकतील, असा दावा करत आम आदमी पार्टीच्या नगरसेवकांनी त्याला कडाडून विरोध केला. तर, आपच्या ज्या दोन नेत्यांविरोधात खटला सुरू आहे, त्यांना मतदान करू देऊ नये, अशी मागणी भाजपा नगरसेवकांनी केली होती आणि त्यामुळे सभागृहात गोंधळ झाला.

याच मुद्द्यावरून ही निवडणूक रखडली होती. दिल्ली महापौर आणि उपमहापौर निवडणुकीत नामनिर्देशित सदस्यांना मतदान करण्याची परवानगी देण्याच्या नायब राज्यपालांच्या निर्णयाला आप नेत्या डॉ. शेली ओबेरॉय यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. या याचिकेवर सुनावणी घेतल्यानंतर न्यायालयाने हा निर्णय दिला.

### सभागृहात गोंधळ

**गेल्या 6 फेब्रुवारी 2023 रोजी महापौर आणि उपमहापौरपदासाठी तिसऱ्यांदा निवडणूक प्रक्रिया घेण्यात आली. पण नायब राज्यपालांनी नामनिर्देशित केलेले सदस्यांनाही महापौर आणि उपमहापौरपदाच्या निवडणुकीत मतदान करण्यास यावेळी परवानगी देण्यात आली होती. हे सदस्य भाजपाच्या पारड्यात मते टाकतील, असा दावा करत आम आदमी पार्टीच्या नगरसेवकांनी त्याला कडाडून विरोध केला. तर, आपच्या ज्या दोन नेत्यांविरोधात खटला सुरू आहे, त्यांना मतदान करू देऊ नये, अशी मागणी भाजपा नगरसेवकांनी केली होती आणि त्यामुळे सभागृहात गोंधळ झाला.**


---

# कर्नाटकमध्येही बनणार राम मंदिर

## मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांची बजेटमध्ये घोषणा

।कर्नाटक। महाईन्यूज ।

कर्नाटकमध्ये यंदा निवडणुका होणार आहेत. मुख्यमंत्री बसवराज बोम्मई सरकारच्या कार्यकाळातील शेवटचा अर्थसंकल्प सादर केला. निवडणुकीचे वर्ष असल्याने अर्थसंकल्पात अनेक लोकाभिमुख घोषणा केल्या आहेत. सीएम बोम्मई यांनी बजेटमध्ये राम मंदिर बांधण्याची घोषणा केली आहे. राजधानी बेंगळुरूला 10 हजार कोटी रुपये देण्यात आले आहेत.रस्ते बांधणीसाठी 300 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. बीबीएमपीच्या अखत्यारीत येणाऱ्या 110 गावांचे रस्ते बांधण्यात येणार आहेत. महसूल 20 टक्क्यांनी वाढला :मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी कर्नाटक विधानसभेत सादर केलेल्या त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणात सांगितले की, राज्य सरकारचा 2023-24 या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प 3.09 लाख कोटी रुपये आहे. मुख्यमंत्र्यांच्या म्हणण्यानुसार, कोरोना महामारीनंतर राज्याची अर्थव्यवस्था पूर्वपदावर आली आहे. यंदा महसूल वाढीचा अर्थसंकल्प सादर केला गेला. कर्नाटकच्या कर महसुलात 20 टक्क्यांनी वाढ झाली आहे.



### मुख्यमंत्री बोम्मई यांच्या अर्थसंकल्पात मोठ्या घोषणा

**कर्नाटकातील मंदिरांच्या जीर्णोद्धारासाठी येत्या दोन वर्षांत एक हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.**

**राज्याची राजधानी बेंगळुरूपासून 45 किमी अंतरावर असलेल्या रामदेवरा बेट्टा हिल, ज्याला रामनगर म्हणूनही ओळखले जाते, येथे भव्य राम मंदिर बांधले जाईल.**

**शेतकऱ्यांना दिले जाणारे बिनव्याजी कर्ज 3 लाखांवरून 5 लाख रुपये करण्यात आले आहे. शेतकरी आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी जीवन ज्योती विमा योजना जाहीर करण्यात आली आहे. यासाठी 150 कोटींची घोषणा करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना चंदनाची नवीन वाण देण्यात येणार आहे. रेशीम शेती 10 हजार एकरपर्यंत वाढवली जाईल. सिद्धलगट्टा येथे 75 हायटेक रेशीम बाजार उभारण्यात येणार आहेत. बेघरांसाठी नवीन घरे बांधली जातील. यासाठी 500 कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणार आहे. मनरेगा अंतर्गत 88 लाख लोकांना रोजगार दिला जाणार आहे. केम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळ अत्याधुनिक स्टार्टअप पार्क तयार केले जाईल. त्यासाठी 30 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.**

# “..आणि सोनाली कुलकर्णी पुन्हा एकदा प्रेमात”



वाघांचा मोह भल्याभल्यांना आवरत नाही आणि म्हणूनच राज्यातीलच नाही तर देश आणि विदेशातील पर्यटकांसह ‘सेलिब्रिटी’ महाराष्ट्रात व्याघ्रदर्शनासाठी येत असतात. या सर्वांची पावले व्याघ्रदर्शनासाठी ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्पाकडे वळतात. मात्र, मराठी चित्रपट अभिनेत्री सोनाली कुलकर्णी हीने वेगळी वाट निवडली. नुकतीच ती पेंच व्याघ्रप्रकल्पात येऊन गेली. सफारीदरम्यान तिला वाघाने निराश केले नाही आणि व्याघ्रदर्शनाने हरखून गेलेल्या सोनालीने प्रकल्पाच्या कर्मचाऱ्यांशी मनमोकळेपणाने संवाद साधला.

सोनाली कुलकर्णीने पेंच व्याघ्रप्रकल्पात फक्त सफारीच केली नाही, तर वन्यजीव व्यवस्थापन आणि येथे चालणाऱ्या नाविन्यपूर्ण उपक्रमाबाबत तिने मनमोकळ्या गप्पा मारल्या. व्याघ्रदर्शन ही तिची प्राथमिकता नव्हतीच, तर निसर्गाच्या सान्निध्यात ती जास्त रमली. ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्पाप्रमाणे पेंच व्याघ्रप्रकल्पात पर्यटकांना सहजासहजी व्याघ्रदर्शन होत नाही. मात्र, अभिनेत्री सोनाली कुलकर्णीला वाघाने सहज दर्शन दिले. यावेळी पेंच व्याघ्रप्रकल्प व्यवस्थापनाने तिला पेंच व्याघ्रप्रकल्पाची आठवण म्हणून टोपी भेट दिली. एरवी ‘सेलिब्रिटी’ म्हटले की सहज संवाद दुर्लभ, पण सोनाली कुलकर्णीने मनमोकळ्या गप्पा मारत व्याघ्रप्रकल्पाविषयी पूर्ण माहितीदेखील घेतली. एवढेच नाही तर ‘ट्विटर’ वरून तिने अनुभवाची ध्वनीचित्रफितदेखील दिली.

# शहजादा' हिट की फ्लॉप!



रोहित धवन दिग्दर्शित 'शहजादा' रिलीज झाला आहे. 'शहजादा' मध्ये कार्तिक आर्यन,कृति सनन यांची रोमँटिक लव्हस्टोरी लोकांना पहायला मिळणार आहे. सोशल मीडियावर सिनेमा रिलीज झाल्या झाल्या 'शहजादा'चे रिव्हू यायला लागले आहेत. काही ट्रीटर टुजर्सनी सिनेमाला 5 स्टार दिले आहेत तर सिनेमा पूर्ण कॉपी केला गेलाय असं काहींनी म्हटलं आहे.

कार्तिक आर्यन आणि क्रिती सनन यांच्यासोबत 'शहजादा' सिनेमात परेश रावव,रोनित रॉय,सनी हिंदुजा आणि मनिषा कोईराला यांच्यादेखील प्रमुख व्यक्तिरेखा आहेत. हा सिनेमा अल्लू अर्जूनचा 'अली वैकुंठपुरमल्लो' सिनेमाचा रीमेक आहे. या सिनेमात अल्लू सोबत पूजा हेगडे मुख्य भूमिकेत होती. सिनेमाच नाही तर यातील गाणी देखील सुपरहिट झाली होती, तसंच,आता 'शहजादा' सिनेमातील गाणीही हिट झालेली पहायला मिळाली. त्यामुळे ट्रेड ॲनलिस्टना 'शहजादा' कडूनही अपेक्षा आहेत.कार्तिक आर्यन 'शहजादा' सिनेमाच प्रमोशन गेल्या अनेक दिवसांपासून करताना दिसत होता. गुरुवारी १६ फेब्रुवारी रोजी 'शहजादा' सिनेमाचा ट्रेलर जगातील सगळ्यात उंच इमारत बुर्ज खलिफावर दाखवण्यात आला होता,ज्याला पाहून कार्तिक आर्यनला आकाश ठेंगणं झालेलं दिसत होतं.

'शहजादा' सिनेमाचं दिग्दर्शन रोहित धवननं केलं आहे. संगीत प्रीतमनं दिलंय तर भूषण कुमार,अल्लू अरविंद,अमन गिल यांच्यासोबत स्वतः कार्तिक आर्यननं देखील सिनेमाची निर्मिती केली आहे. ट्रीटरवर 'शहजादा' ज्या पद्धतीनं ट्रेन्ड होताना दिसत आहे त्यावरनं तरी दिसत आहे की 'शहजादा' लोकांच्या पसंतीस उतरला आहे.

# बॉक्स ऑफिसवर शाहरुख खानचाच डंका!

बॉलिवूडचा बादशाह शाहरुख खान हा गेले काही दिवस सातत्याने चर्चेत आहे. शाहरुखच्या ‘पठाण’ चित्रपटाने पहिल्याच दिवशी बॉक्स ऑफिसवर धमाकेदार कमाई केली. या चित्रपटाने अनेक चित्रपटांचे रेकॉर्ड मोडले आहेत. २५ जानेवारीला प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने पहिल्या दिवशी ५७ कोटींची कमाई केली. त्यानंतर आजवर जगभरात या चित्रपटाने ६०० कोटीहून अधिक कमाई केली आहे. बॉक्स ऑफिसवर या चित्रपटाने इतिहास रचला आहे. शाहरुखच्या



‘पठाण’बरोबरच ‘दिलवाले दुल्हनिया ले जाएंगे’ हा चित्रपटही सध्या पुन्हा प्रदर्शित करण्यात आला आहे, आणि हा चित्रपटही पुन्हा बॉक्स ऑफिसवर धमाल करत आहे. व्हॅलेंटाईन्स डेच्या निमित्ताने हा चित्रपट पुन्हा प्रदर्शित करायचा निर्णय घेण्यात आला. १० फेब्रुवारीला या चित्रपटाने २.२ लाखांची कमाई केली. दुसऱ्याच दिवशी या बॉक्स ऑफिसवर याची कामाई पाचपटीने वाढली, आणि १२ फेब्रुवारीलासुद्धा या चित्रपटाने तेवढीच कमाई केली आहे.



# 'वेड'ची नॉट आऊट हाफ सेंच्युरी

रितेश देशमुख - जिनिलिया देशमुख यांच्या वेड सिनेमाची जादू अजूनही कायम आहे. वेड प्रदर्शित होऊन तब्बल दीड महिन्यांचा कालावधी लोटला. तरीही वेड सगळ्या महाराष्ट्रभरात गाजत आहे.

दिवसेंदिवस वेड कमाईचे नवीन आकडे मोडत जातोय. नुकतीच रितेश - जिनिलियाच्या वेड बद्दल एक आनंदाची बातमी समोर आली आहे. ज्यामुळे मराठी प्रेक्षकांना नक्कीच आनंद होईल.

वेड सिनेमाच्या टीमने नुकतीच एक पोस्ट रिलीज केलीय. या पोस्टमध्ये वेड ने ५० दिवस पूर्ण केल्याचं सांगितलं आहे. ALL TIME BLOCKBUSTER झालेल्या वेडने यशस्वी ५० दिवस पूर्ण केले आहेत. वेडनेस कोणीही थांबवू शकत नाही.. तुमच्या प्रतिसादासाठी खूप आभार.. आमच्याकडे शब्दच नाहीत..

अशा शब्दात रितेशच्या मुंबई फिल्म कंपनीने प्रेक्षकांचे आभार मानले आहेत

५० दिवस पूर्ण करून वेड ने कमाईत सुद्धा बाजी मारली आहे. वेडने आतापर्यंत ७४ कोटींचा टप्पा पूर्ण केलाय. जगभरात वेडने ७४ कोटींपेक्षा जास्त कमाई केली असून भारतात वेडने ६०. ६७ कोटींची कमाई केली आहे.

अशाप्रकारे सैराटननंतर वेड सर्वात जास्त कमाई करणारा सिनेमा ठरल्याची शक्यता आहे. वेड निमित्ताने मराठी सिनेमांची नवीन वर्षाची धमाकेदार सुरुवात झालीय. वेड सिनेमा रिलीज झाल्यानंतर प्रेक्षकांनी सिनेमाला भरभरून प्रतिसाद दिला. महाराष्ट्रातील ठिकठिकाणी वेडने हाउसफुल्लची पाटी झळकवली.

वेडला मिळणार प्रतिसाद बघून रितेशने वेड तुझा या गाण्याचं नवीन व्हर्जन आणि काही प्रसंग समाविष्ट करून वेडची नवीन कॉपी थिएटरमध्ये रिलीज करण्यात आली. त्यामुळे पुन्हा एकदा प्रेक्षकांनी वेड पाहायला गर्दी केली.

वेड सिनेमात रितेश - जिनिलिया जिया शंकर, अशोक सराफ, विद्याधर जोशी अशा कलाकारांच्या प्रमुख भूमिका आहेत.

# आयपीएलचे बिगुल वाजले!

## पहिला सामना 31 मार्चला, 28 मे रोजी अंतिम सामना, 16व्या हंगामाचे वेळापत्रक जाहीर

। मुंबई।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**इंडियन प्रीमियर लीगच्या (आयपीएल) १६व्या हंगामाचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) शुक्रवारी (१७ फेब्रुवारी) माहिती दिली की, पहिला सामना ३१ मार्च रोजी गतविजेता गुजरात टायटन्स आणि चार वेळचा विजेता चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात होणार आहे. याचाच अर्थ युवा स्टार हार्दिक पांड्याला पहिल्याच सामन्यात अनुभवी महेंद्रसिंग धोनीचे आव्हान असेल. २८ मे रोजी अंतिम सामना होणार आहे.**

५२ दिवसांत १० संघांमध्ये ७० लीग सामने खेळवले जातील. त्यानंतर चार प्लेऑफ सामने खेळवले जातील. अशा प्रकारे या स्पर्धेत एकूण ७४ सामने होणार आहेत. १८ डबल हेडर असतील (एका दिवसात दोन सामने). सर्व सामने देशभरातील एकूण १२ मैदानांवर खेळवले जातील. साखळी फेरीत एक संघ आपल्या घरच्या मैदानावर सात सामने आणि विरोधी संघाच्या मैदानावर सात सामने खेळेल. गेल्या वेळी गुजरात टायटन्सने अंतिम फेरीत राजस्थान रॉयल्सचा पराभव करून विजेतेपद पटकावले होते. तो प्रथमच आयपीएलमध्ये खेळला. पहिल्याच प्रयत्नात तो यशस्वी झाला होता.



### सर्व 10 संघ साखळीमध्ये 14-14 सामने खेळावे लागतील

**»सर्व १० संघांची दोन गटात विभागणी करण्यात आली आहे. ग्रुप स्टेजमध्ये प्रत्येक संघ १४-१४ सामने खेळेल. या दरम्यान, प्रत्येक संघाला त्यांच्या घरी ७ सामने खेळावे लागतील, तर उर्वरित ७ सामने विरोधी संघाच्या मैदानावर खेळावे लागतील. अशा प्रकारे प्रत्येक संघ ७ होम आणि ७ अवे सामने खेळेल.**

### आयपीएल 2023

गट-अ: मुंबई इंडियन्स, कोलकाता नाइट रायडर्स, राजस्थान रॉयल्स, दिल्ली कॅपिटल्स, लखनौ सुपर जायंट्स.

गट-ब: चेन्नई सुपर किंग्ज, पंजाब किंग्ज, सनरायझर्स हैदराबाद, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू, गुजरात टायटन्स.

### 10 संघ एकूण 70 लीग सामने 12 ठिकाणी खेळतील

आयपीएल २०२३ मध्ये एकूण १२ सामने १२ ठिकाणी खेळवले जातील. यावेळी गुवाहाटी, धर्मशाला येथेही आयपीएल सामने आयोजित करण्याची संधी मिळणार आहे. यावेळी अहमदाबाद, मोहाली, लखनऊ, हैदराबाद, बंगळुरू, चेन्नई, दिल्ली, कोलकाता, जयपूर, मुंबई, गुवाहाटी, धर्मशाला या स्टेडियमवर सामने खेळवले जातील.

# शमीची जबरदस्त गोलंदाजी!

## पहिल्याच दिवशी कांगारूंना बाद करण्यात टीम इंडिया यशस्वी

।दुबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

शुक्रवारपासून (दि.१७ फेब्रुवारी) दिल्ली येथे भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया संघात दुसऱ्या कसोटी सामन्याला सुरुवात झाली. या सामन्यात भारतीय संघाचे अनेक खेळाडू चमकले. चेतेश्वर पुजारा याने सामन्यात पाऊल ठेवताच इतिहास रचला. तो १००वा कसोटी सामना खेळणारा भारताचा १३वा खेळाडू बनला. यानंतर आर अश्विन याने ऑस्ट्रेलियाविरुद्ध १०० कसोटी विकेट्स घेण्याचा कारनामा केला. या यादीत आता रवींद्र जडेजा याच्या नावाचाही समावेश झाला. त्याच्याच जोडीला अश्विन, शमी यांनी त्याला साथ देत ऑस्ट्रेलियाला पहिल्याच दिवशी बाद करण्यात महत्वाची भूमिका निभावली.




भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील दिल्ली येथे सुरु असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात २६३ धावा केल्या. सकाळी कर्णधार पॅट कमिन्सने नाणेफेक जिंकून ऑस्ट्रेलियाने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या डावाची सुरुवात दमदार झाली. डेव्हिड वॉर्नर आणि उस्मान खाव्जा यांनी अर्धशतकी भागीदारी केली. मात्र १५ धावा करून वॉर्नर बाद झाला. उस्मान ख्वाजाने एक बाजू लावून धरली. अश्विनने एकाच षटकात आयसीसी क्रमवारीतील प्रथम आणि दुसऱ्या क्रमांकावरील फलंदाजाना बाद केले. मार्नस लाबुशेनने १८ धावा तर स्टीव्ह स्मिथला भोपळाही फोडता आला नाही.शतकाच्या उंबरठ्यावर असलेल्या उस्मान ख्वाजाचा केएल राहुलने अफलातून झेल घेतला आणि ८१ धावांवर त्याला बाद केले. त्यानंतर पीटर हँड्सकॉम्बने नाबाद ७२ धावांची खेळी करत ऑस्ट्रेलियाला सन्मानजनक धावसंख्येपर्यंत पोहचवले. त्याला कर्णधार पॅट कमिन्सने ३३ धावा करत साथ दिली.

### रवींद्र जडेजाचा विक्रम

**» यासह जडेजाच्या नावावर खास विक्रमाची नोंद झाली. तो कसोटी कारकीर्दीत २५० विकेट्सचा टप्पा पार करणारा खेळाडू बनला. विशेष म्हणजे, जडेजा याने ही कामगिरी ६२ कसोटी सामन्यातील ११७ डावात २.४४च्या इकॉनॉमी रेटने २५० विकेट्स चटकावल्या. तो कसोटीत भारताकडून २५० किंवा त्यापेक्षा अधिक विकेट्स घेणारा भारताचा ८वा गोलंदाज ठरला. लान्स गिब्स, क्रेग मॅकडरमॉट आणि ब्रेट ली यांनीदेखील जडेजाइतक्याच ६२ कसोटी सामन्यांमध्ये २५० विकेट्स घेण्याचा कारनामा केला होता.**

# चेतन शर्माच्या स्टिंग ऑपरेशनवर पाकिस्तानी दिग्गज संतापला

। नवी दिल्ली । महाईन्यूज
। वृत्तसंस्था ।

एका वृत्तवाहिनीच्या स्टिंग ऑपरेशननंतर क्रिकेट विश्वात खळबळ उडाली आहे. या स्टिंगमध्ये वरिष्ठ निवड समितीचे प्रमुख चेतन शर्मा यांनी अनेक दावे केले आहेत. भारतीय खेळाडू फिटनेससाठी इंजेक्शन घेतात, असेही त्याने सांगितले. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) अद्याप त्याच्यावर कोणतीही कारवाई केली नसून त्याची खुर्ची जाणार असल्याचे मानले जात आहे.



दरम्यान, अनुभवी महेंद्रसिंग धोनीला टीम इंडियाच्या निवड समितीचा अध्यक्ष बनवावा, असा सल्ला एका अनुभवी खेळाडूने दिला आहे. माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनीला नवा निवड समितीचा अध्यक्ष बनवावा, असा सल्ला पाकिस्तानचा माजी क्रिकेटपटू दानिश कनेरियाने बीसीसीआयला दिला आहे. दानिश कनेरिया एका मुलाखतीदरम्यान म्हणाला, “बीसीसीआयच्या अधिकाऱ्यांनी एमएस धोनीशी एकदा बोलावे.

### स्टिंग ऑपरेशननंतर चेतन अडचणीत

**» मुख्य निवडकर्ता चेतन शर्मा यांनी एका वृत्तवाहिनीच्या स्टिंग ऑपरेशनमध्ये अनेक खुलासे केले आहेत. यानंतर त्यांची खुर्ची धोक्यात आली आहे. टी२० वर्ल्ड कपमध्ये टीम इंडियाच्या खराब कामगिरीनंतर त्याला मुख्य निवडकर्त्याच्या पदावरून हटवण्यात आले होते, मात्र २ महिन्यांनंतर ते पुन्हा या खुर्चीवर विराजमान झाले. या स्टिंग ऑपरेशननंतर चेतन शर्मा यांनी स्वतःला अडचणीत आणले आहे. भारतीय क्रिकेटमधील अशा वादांच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तानचा माजी फिरकीपटू दानिश कनेरियाने एक सूचना केली आहे.**